# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक गा–हाणे निवारण मंच
# नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

---

## केस क्रं. ग्रागानिमं/नाशप/०४७ /२००९

अर्जदार : श्री शेषराव रामाजी वांगुलकर
रा. दहेगाव रोड, साई मंगल कार्यालयाजवळ,
खापरखेडा, तहसील सावनेर
जिल्हा नागपूर.

– विरूध्द –

गैरअर्जदार : कार्यकारी अभियंता, विभागा क्रं. 2,
म.रा.वि.वितरण कंपनी मर्या,
नागपूर.

गणपूर्ती : 1) श्री एस.एफ.लांजेवार
कार्यकारी अभियंता तथा
सदस्य–सचिव,
ग्राहक गा–हाणे निवारण मंच
नाशप, नागपूर.

2) श्रीमती गौरी चांद्रायण, सदस्या
ग्राहक गा–हाणे निवारण मंच,
नाशप, नागपूर.

–– आदेश ––

पारीत दि. ३०.०९.२००९

ग्राहक गा–हाणे निवारण मंचात अर्जदार यानी तक्रार अर्ज दिनांक २९.०७.२००९ रोजी म.राज्य विज नियामक आयोग (ग्रागानिम व विद्युत लोकपाल) विनियम 6.4 विनियम 2006 प्रमाणे दाखल केलेला आहे.

अर्जदाराच्या गा–हाण्याचा तपशील :–

विद्युत बिलाची आकारणी जास्त रक्कमेची पाठविण्याबाबात दिनांक २५. १०.२००८ ला रू. ८,६२०/– चे बिल देण्यात आले व त्यानंतर मार्च २००९ ला रू. ४,२६६ चे बिल कमी करण्यात आले ते ग्रा–हकाला मान्य नाही. बिल कमी करून देण्याकरीता त्याने मंचात तक्रार दाखल केलेली आहे, आणि योग्य तो आदेश पारीत करावा म्हणून विनंती केलेली आहे.

अर्जदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष येथे दिनांक ०८.०५.२००९ रोजी प्रथम तक्रार केलेली होती. कक्षातून तक्रार कर्त्याला काहीही उत्तर मीळाले नसल्यामुळे अर्जदाराने दिनांक २९.०७.२००९ रोजी मंचात अर्ज सादर केला

मंचाने दोन्ही पक्षकाराचे म्हणणे मांडण्याकरिता दिनांक १८.०८.२००९ रोजी उपस्थित राहण्याचे कळविण्यात आले परतु अर्जदार वरील तारखेस अनुपस्थित होते, गैरअर्जदाराचे म्हणणे ऐकण्यात आले.

वाढीव बिल कमी करून देण्याबाबत अपिलकर्ता हयांनी ग्राहक मंचाला दिनांक २०.०३.२००९ रोजी लेखी पत्राव्दारे तक्रार दाखल केली त्यात त्यांनी त्यांच्या घरगुती विद्युत बिलासंबधी मुद्ये उपस्थित केले.

1) अर्जदाराने सन २००० मध्ये विद्युत पुरवठा घेतला त्यावेळी त्यांना जुने वापरलेले मिटर लावण्यांत आले होते व ते सप्टेंबर २००८ पर्यंत ठेवण्यात आले होते.

2) सप्टेबर २००८ मध्ये जुने मिटर काढुन नवीन ईलेक्ट्रॉनिक्स मिटर बसविण्यांत आले. आक्टोबर २००८ मध्ये रू. ८६२०/- चे बिल एकदमच देण्यात आहे.

3) जुने मिटर काढतांना व नवीन मिटर बसवितांना कोणत्याच प्रकारची नोटीस किंवा सुचना देण्यात आलेली नव्हती. अपिलकर्त्यानी दि. १९.०३.२००९ ला सहाय्यक अभियंता म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित खापरखेडा हयांना वरील बाबत लेखी

पत्राव्दारे सुचना दिलेली होती व वरील बाबीचा उल्लेख केला होता पुराव्यादाखल त्यांनी विद्युत बिले जोडलेली होती.

गैरअर्जदाराने त्यांचे लिखीत म्हणणे सादर केलेले आहे तक्रारकर्ता श्री शेषराव रामाजी वांगुळकर रा. खापरखेडा, ग्राहक क्रं. ४११२८००४०३८० यांचे मिटर क्रं. ३९८७९५ हे दि. ११.०८.२००८ ला विशेष चोरी अभियाना अंतर्गत तपासले असता (ॲक्युचेक यंत्राव्दारे) ते ८२.६२% हळु फिरत असल्याचे आढळले व त्यानुसार या कार्यालयातर्फे मागील सहा महिन्यांचे मिटर हळु असल्याची तफावत व त्याचे समायोजन १२६ कलमाखली विज कायदा 2003 नुसार करण्यात आले व ते रू. ८६२०/- आकारण्यात आले त्यांनतर ग्राहक जास्तीचे बिल आहे याची तक्रार घेवून आले असता त्यांचा विज वापर हा घरगुती असल्याने ६ महिन्याचे समायोजन हे 3 महिन्याचे सुधारण्यात आले व त्यांना माहे मार्च २००९ चे बिलांत रू. ४५३०/- कमी करण्यात आलेले आहेत. ग्राहकाचे नवीन मिटर क्रं. १०३६७५१५ याचा वापर आता योग्य असुन जुने मिटर कसे हळु होते हे ग्राहकाच्या नव्या व जुन्या मिटरच्या वापरावरून समजवून सांगण्यात आलेले आहे. करिता तक्रार कर्त्याची तक्रार खारीज करण्यात यावी असे नमुद केले.

केसची प्रत्यक्ष सुनावणी दि. १८.०८.२००९ झाली. सुनावणीचे वेळी ग्राहक किंवा प्रतिनीधी हजर झाले नव्हते त्यामुळे म.रा.वि.वि.कंपनीचा वतीने सहाय्यक अभियंता खापरखेडा हयांनी बाजु मांडली त्यांनी मिटर तपासले असता ८२% हळु फिरत असल्याचे सांगीतले त्याप्रमाणे त्याला बिलींग करण्यांत आले असे सांगितले तसेच त्यांनी नवीन मिटर चे रिडींगच्या प्रमाणात जुन्या मिटर च्या वापरामध्ये बरीच तफावत लक्षांत येत असल्याचे सांगीतले. (कारण की जुने मिटर 82% हळु फिरत असल्यामुळे) त्यांनी बिलाची आकारणी ही रू. 4720/- केली होती परंतु नंतर त्याची सुधारणा करून त्यांना 3 महिन्याचे 4530/- रूपयाचे बिल देण्यांत आल्याचे सांगितले.

अपीलकर्ता दुपारी 1 वाजता कार्यालयात हजर झाले त्यांनी त्यांच्या उत्तरात सांगीतले कि सादर केलेल्या लेखी निवेदनाप्रमाणे केस संबधी विचार करावा अशी विनंती केली.

अपीलकर्त्याचा व कंपनीच्या प्रतिनीधीनी सादर केलेल्या लेखी पुरावे, दस्ताऐवज, तसेच प्रत्यक्ष सुनावणी दरम्यान केलेल्या युक्तीवादावरून मंचाने खालील निर्णय घेतला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग मुंबई विनीमय २००५ च्या कलम १५.४.१ च्या अधिनियम भाग 12 आणि भाग 14 मधील तरतुदीना अधिन राहुन मिटर सदोष असेल तर तपासणी अहवालाच्या नियमानुसार तयार करण्यांत आलेले देयक व त्यासोबत तपासणी अहवाल पाठविण्यांत आला असेल तर मीटर सदोष असल्याचे ज्या महिण्यांत निदर्शसणास आले असेल त्या महिण्याच्या मागील जास्तीत जास्त 3 महिन्याच्या कालावधीतील ग्राहकाच्या देयकाची रक्कम समायोजीत करण्यांत येईल असे नमुद केलेले आहे.

<u>15.4.1</u>

“परंतु असे की, मीटरची मोहोर तुटलेली किंवा त्यास हानी पोचली असल्यास, मीटरमधील दोषांची अथवा बिघाडाची तपासणी करण्यात येईल, मीटर सदोष असल्यास, वरील खंड 15.4.1 नुसार आणि ते बिघडले गेले असल्यास अधिनियमाच्या कलम 126 किंवा 135 नुसार, प्रत्येक प्रकरणी त्यातील परिस्थितीवर अवलंबुन आकार निर्धारण करण्यात येईल.

परंतु असे की, मीटरमध्ये नोंदी घेणे थांबले गेले असल्यास, ज्या महिन्यात नोंदी घेणे थांबले गेले असेल त्याच्या मागील जास्तीत जास्त 3 महिन्यापर्यंत, ज्या महिन्याचे देयक तयार करण्यात येणार आहे. त्या महिन्यामागील बारा महिन्यांत मीटरवर नोंदल्या गेलेल्या विजेच्या सरासरी वापरावर आधारीत ग्राहकाचे देयक तयार करण्यांत येईल”.

## निर्णय

तक्रारकर्त्याचा अर्ज अशंतः मंजूर करण्यांत येत आहे.

अपीलकर्त्यास महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग मुंबई विनीमय २००५ च्या कलम १५.४.१ च्या अंर्तगत विज आकारणी करावी.

गैरअर्जदाराला आदेश देण्यात येत आहे की तक्रारकर्त्याचे बिल दुरूस्त करून आदेशाची प्रत मिळाल्यापासून तसा अहवाल हया मंचास 30 दिवसांचे आत सादर करावा.

| | |
|---|---|
| सही/– | सही/– |
| (एस.एफ. लांजेवार) | (श्रीमती गौरी चंद्रायण) |
| सदस्य – सचिव | सदस्या |

ग्राहक गा–हाणे निवारण मंच

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,

नागपूर शहर परिमंडळ, नागपूर.

सदस्य – सचिव

(कार्यकारी अभियंता)

ग्राहक गा–हाणे निवारण मंच (ना.श.प.)

म.रा विद्युत वितरण कंपनी मर्या. नागपूर